कार्यालय परिपत्रक क्रं ८६

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि,
मध्यवर्ती पास विभाग कार्यालय
दिनांक :3/०९/२०२०

विषय : – लॉकडाऊनपुर्वी पास काढलेल्या पासधारकांना पासचा वापर न झाल्याने उर्वरीत दिवसांची मुदतवाढ.

संदर्भ : – १) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे दालनात झालेल्या दि. २१/०८/२०२० रोजीच्या बैठीकीतील निर्देश/आदेश.
२) का.आ.क्रं. दि.02/०९/२०२० अन्वये मुदतवाढ कार्यवाही बाबतचे आदेश.

पुणे व पिंपरी–चिंचवड शहरात टाळेबंदी (लॉकडाऊन) जाहिर होण्यापुर्वी अनेक नोकरदार, विद्यार्थी, जेष्ठनागरिकांसह नियमीत प्रवाशांनी पासकेंद्रावरून पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील बसपासेस काढलेले आहेत. तथापी दि. २२/०३/२०२० रोजी कोव्हिड–१९ चे पार्श्वभूमीवर अचानक टाळेबंदी जाहिर झालेने अत्यावश्यक सेवा वगळता महामंडळाची सर्वसाधारण प्रवासी बससेवा बंद करण्यात आली त्यामुळे नियमीत पासधारक नागरिकांना बसपासचा वापर करता आलेला नाही.

महामंडळाचे बस संचलन दि. ३ सप्टेंबर २०२० पासून सुरू होणार असल्याने प्रवाशी नागरिकांचे मागणी व विनंतीस अनुसरून मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी विषयांकीत बाबीस मान्यता दिलेली आहे. सबब मध्यवर्ती पास कार्यालयातून पासेसची खातरजमा करून स्वारगेट, महात्मा गांधी, हडपसर बसस्थानक, मनपा, डेक्कन, पुणेस्टेशन (मोलेदीना), विश्रांतवाडी, वाघोली, कात्रज, वारजे माळवाडी, निगडी, चिंचवड गाव, पिंपरी चौक (लोखंडे सभागृह), पिंपळे गुरव, भोसरी (शिवाजी चौक) व सांगवी या पासकेंद्रावरून संबंधीत पासधारकांना त्याच मॅन्युअल पासवर उर्वरीत दिवसांची मुदत वाढवून देण्यात आलेली आहे. तसेच मी–कार्ड प्रवासी पासधारकांना उर्वरीत दिवसांचा संगणकावर तयार केलेला पास पासविभाग प्रमुख व पास लेखनिक यांचे स्वाक्षरीने देण्यात आलेले आहेत.

तरी याबाबत सर्व आगाराकडील **वाहक** तसेच **चेकर सेवकांना** कळविणेत येते की, अशा प्रकारचे पासेसवर मुदतवाढ करून देण्यात आलेली आहे. सबब बस प्रवासादरम्यान अशा पासधारकांची अडवणूक करू नये जेणे करून संबंधीत पासधारकांची तक्रार येणार नाही याची संबंधीत सेवकाने नोंद घ्यावी.

31/8

वाहतुक व्यवस्थापक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि

प्रत – वाहतुक व्यवस्थापक
सर्व आगार .
मुख्यालय क्रं. १ व २ Gaikwad S.R.
मध्यवर्ती पास विभाग कार्यालय
नोटीस बोर्ड